# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/05 / of 2018**

परिपत्रकः

विषयः-- बृहत आराखडा तयार करण्यासाठी सर्व समावेशक सुचना करणेबाबत.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालय/संस्था यांच्या प्राचार्या, अध्यापक, विद्यार्थी, संस्थाचालक यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या प्रस्तावित पंचवार्षिक (सन २०१९-२० ते २०२३-२४) बृहत आराखडा तयार कराव्यांचे काम चालू आहे. ज्या ठिकाणी नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पूणे ह्यांचे क्र. युएनआय/१२३/१७)/अधी.३/विशी-/५१८४ दिनांक ०३ मे, २०१८ नुसार सुचना मागविण्यात आल्या आहेत. सदर सुचना **ar.affiliation2@fort.mu.ac.in** या ई-मेल वर दिनांक १६ मे, २०१८ पर्यंत देण्यात याव्यात.

*महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०७ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे:-*

१. विद्यापीठ प्रत्येक पाच वर्षांनी एक सर्वसमावेशक सम्यक योजना तयार करील आणि आयोगाकडून मान्यता मिळवील. विशेषतः विद्यापीठाच्या अधिकारितेतील सेवारहित व न्यूनविकसित क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करून उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वसमावेशक समन्यायी वाटप होण्याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयांची व परिसंस्थांची स्थाने निश्चित करण्यासाठी, अशी योजना तयार करील. अशी योजना, अधिष्ठाता मंडळाकडून तयार करण्यात येईल आणि व्यवस्थापन परिषदेमार्फत ती योजना विद्यापरिषद व अधिसभा यांच्यापुढे ठेवण्यात येईल.

२. सम्यक योजनेमध्ये त्या प्रदेशाच्या सामाजिक व आर्थिक गरजांचा, नोकरीच्या उपलब्ध संधींचा व उद्योगाच्या आवश्यकतांचा अभ्यास करून निर्धारित करण्यात येईल अशा परवानगी द्यावयाच्या नवीन पाठ्यक्रमांचा आणि विद्याशाखांचा समावेश असेल आणि व्यापक प्रदेश, समन्याय गुणवत्ता संशोधन, संबद्धता आणि दर्जा याबाबतची राष्ट्रीय व राज्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ती सम्यक योजना राज्य शासन आणि राष्ट्रीय उच्च शैक्षणिक धोरण यांच्या धोरणांनुसार व त्यांच्या योजनांशी अनुरूप असली पाहिजे.

३. सम्यक योजनेत, विविध प्रदेशातील उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयांना आणि परिसंस्थांना परवानगी द्यावयाचे विषय, नवीन तुकड्यांची संख्या आणि सॅटेलाईट केंद्रे याबद्दलची मागणी विचारात घेतल्यानंतर त्याकरिता तरतूद करण्यात येईल आणि ती सम्यक योजना, कलम ७६ खालील आयोगाच्या योजनांशी अनुरूप असेल आणि तिला त्यानंतर त्याची मान्यता देण्यात येईल.

४. सम्यक योजना तयार करताना जेथे एकूण नावनोंदणीचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी आहे अशा जिल्ह्यांना तसेच आदिवासी, डोंगराळ व दुर्गम क्षेत्रांना त्याशिवाय राखून ठेवलेल्या दर्जात्मक, सर्वसमावेशक उन्नती, सामाजिक समर्पकता आणि मुल्यशिक्षण यांना पसंतीक्रम देण्यात येईल.

५. विद्यापीठ, उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरूप अशी वार्षिक योजना दरवर्षी तयार करण्याकरिता कालबद्ध कार्यक्रम सुरू करील आणि तो कालबद्ध कार्यक्रम, ज्या वर्षात उच्च शिक्षणाची नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरू करावयाची असतील त्या वर्षाच्या आधीचे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिध्द करील.

६. विद्यापीठ, स्थानिक उद्योगांसाठी आवश्यक असलेली कौशल्य पध्दती, व्यापार व वाणिज्य यासंबधात महिला, विद्यार्थी, मागासवर्ग, आदिवासी जमाती व त्यांच्याशी संबंधित अन्य घटक यांसारख्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित असलेल्या युवकांच्या प्रादेशिक गरजा आणि त्याबाबतच्या युवकांच्या आकांक्षा यासाठी उच्च शिक्षणाच्या सुविधांच्या आवश्यक बाबींसंबंधात प्रत्येक पाच वर्षामध्ये विद्यापीठाच्या भौगोलिक अधिकारिता क्षेत्रात पध्दतशीर क्षेत्रीय सर्वेक्षण हाती घेईल. विद्यापीठ, विद्यापीठाच्या सम्यक योजना विकसित करताना अशा क्षेत्रीय सर्वेक्षणाचे निष्कर्ष उपयोगात आणील आणि अशी वैज्ञानिक आधारसामग्री विकसीत करील.

मुंबई विद्यापीठाच्या प्रस्तावित पंचवार्षिक (सन २०१९-२० ते २०२३-२४) बृहत आराखडा तयार करण्यासाठी संबंधित माहिती खालीलप्रमाणे:[ शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे क्र. युएनआय/ १२३/१७)/अधी. ३/विद्यी-१/४९३८ दिनांक २३ एप्रिल, २०१८ च्या पत्रान्वये ]

१. या प्रक्रियेत शिर्षस्थ मार्गदर्शक म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी काम करावे व सक्रिय सहभागासह नेतृत्व मा. प्र. कुलगुरु यांनी द्यावे.

२. बृहत आराखडा तयार करण्याची प्रमुख जबाबदारी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३६ नुसार अधिष्ठाता मंडळाची असावी.

३. बृहत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया व्यापक व बहुस्पर्शी असल्यामुळे कालबध्द अंमलबजावणीसाठी मुख्य नियोजन व समन्वय समिती गठीत करावी. समितीत सर्व घटकांचा समावेश असावा. तर बृहत आराखडयातील महत्वाच्या घटक विषयांसाठी घटक निहाय उपसमित्या स्थापन कराव्यात.

४. या प्रक्रियेत विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, उद्योजक व समाजातील संबंधित घटकांचे सक्रिय योगदान प्राप्त होईल यासाठी विशेष प्रयत्न करावे.

५. सर्वेक्षणसाठी वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे, माहिती तंत्रज्ञान या तंत्रांचा वापर करावा व सर्वेक्षण प्रक्रियेत महाविद्यालयीन युवक व शिक्षक यांचा सहभाग असावा. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना योजनेतील युवकांना सहभागी करुन घ्यावे.

६. शैक्षणिक दर्जा व संशोधन यासारख्या घटकांसाठी संख्यात्मक गुणकांचा वापर करावा.

७. बृहत आराखडयातील प्रस्तावित नियोजन व प्रत्यक्ष कृती यांच्या तौलनिक मूल्यमापनाची कालबध्द रचना स्पष्ट करण्यात यावी.

८. बृहत आराखडा तयार करण्यासाठी राज्यस्तरीय समितीमार्फत विद्यापीठ निहाय समन्वय व मार्गदर्शनासाठी तज्ञ निश्चित करण्यात यावेत.

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व कला, वाणिज्य आणि विज्ञान विभागाचे विभागप्रमुख, विद्यार्थी, मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र ठाणे/रत्नागिरी

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:-

१. उपकुलसचिव, नोंदणी व पात्रता विभाग, आंबेडकर भवन, कलिना, सांताक्रुझ (पू.), मुंबई-४०० ९८
२. उपकुलसचिव, जनसंपर्क अधिकारी, फोर्ट, मुंबई-४०० ०३२
३. उपकुलसचिव, विशेष विभाग, फोर्ट, मुंबई-४०० ०३२
४. मा. संचालक/समन्वयक, यु.डी.सी., कलिना, सांताक्रुझ (पू.), मुंबई-४०० ९८
५. मा. कुलगुरू यांचे सचिव
६. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक
७. मा. प्र-कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक
८. मा. संचालक (विद्याविषयक नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक
९. मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक
१०. परिक्षा विभाग, संचालक यांचे स्वीय सहाय्यक
११. वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव

मुंबई-४०० ०३२
70 मे, २०१८